ता ०६/०२/२०१८

दैनिक ललकार

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बाहेरचा समाज समजून घेण्याचे शिक्षण राष्ट्रीय सेवा योजनेतून मिळते

## मालनताई मोहिते

कुंडल दि. ६ (वार्ताहर)- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चार भिंतीच्या बाहेरचा समाज समजून घेण्याचे शिक्षण राष्ट्रीय सेवा योजनेतून मिळते असे मत माजी जि.प.अध्यक्षा मालनताई मोहिते यांनी व्यक्त केले त्या मोहिते वडगाव( ता, कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या यावेळी क्रांती दूध संघाचे चेअरमन किरण तात्या लाड, मो. वडगाव चे सरपंच विजय मोहीते , प्राचार्य डॉ. के. एम . नलावडे आदी उपस्थित होते .

सौ. मोहिते पुढे म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी आई वडीलांचे कष्ट जाणून घ्यावे, घरातून बाहेर पडल्यानंतरच मुलांना आपल्या आई वडीलांचे कष्ट समजून येते . याकरीता विद्यार्थ्यांनी घरातून व गावातून बाहेर पडणे गरजेचे असते आणी याकरीता राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर हे योग्य माध्यम आहे . यातून श्रमाबरोबरच सामाजीक कार्याचे महत्व समजते .



मो. वडगाव( ता. कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी. डी, बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअतर्गत आयोजित श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना माजी जि.प, अध्यक्षा मालनताई मोहीते, यावेळी उपस्थित किरण लाड, प्राचार्य डॉ. के,एम. नलावडे, सरपंच विजय मोहीते , प्रा. डॉ. प्रताप लाड, नवनाथ गुंड आदी मान्यवर.

किरण लाड यावेळी म्हणाले की महाविद्यालयाने श्रमसंस्कार शिबिर हे फक्त उपक्रम म्हणून न राबविता गावातील नागरीकांच्या व सरपंच , उपसरपंच व सर्व सदस्यांच्या सहकार्याने एक काम म्हणून केले गेले हे महत्वाचे व प्रेरणादायी आहे . यामधून राजकारणविरहीत समाजकार्यासाठी मोहीतेवडगाव यासाठी अग्रेसर आहे .

शिबिर काळामध्ये विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता, गटारी साफ करणे, १००% प्लॉस्टीक मुक्त गाव, ग्राम सर्व्हे, याबरोबरच जेष्ठ नागरीक मेळाव्याचे आयोजन हळदीकुंकू, शेतकरी प्रबोधनपर कार्यक्रमांचे ही आयोजन करणेत आले होते , प्रा. गणेश खारगे,ऊसविकास अधिकारी विलास जाधव, डॉ. एस,एच, पाटील, प्रा. विजय शिंदे, प्रा. डॉ. भरत महाडीक, आदींच्या व्याख्यानाचे आयोजन ही करणेत आले होते .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी.बी. लाड यांनी तर श्रमसंस्कारशिबिराच्या पाठीमागिल संकल्पना प्रा. डॉ. के, एम. नलावडे यांनी विशद केली ,सुत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ गुंड यांनी तर आभार प्रा. एस.जी. चौरे यांनी मानले .

यावेळी सुदाम मोहीते, दत्ताजी मोहीते, पांडूरंग मोहीते, भगवान मोहीते, हणमंत मोहीते, वसंतराव मोरे, गावातील सर्व संस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# ा सेवा योजनेतून समाज समजून घेता येतो

## हिते : क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

र

ना चार भिंतीच्या
न घेण्याचे शिक्षण
मिळते, असे मत
ालनताई मोहिते
 मोहिते वडगाव
तेअग्रणी जी. डी.
च्या राष्ट्रीय सेवा
बिराच्या समारोप
. यावेळी क्रांती
केरण लाड, मो.
 मोहिते, प्राचार्य
ो उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी
वे, घरातून बाहेर
ापल्या पालकांचे
रता विद्यार्थ्यांनी
र पडणे गरजेचे
ीय सेवा योजनेचे



**कुंडल : मो. वडगाव येथे शिबिरात बोलताना मालनताई मोहिते, किरण लाड, प्राचार्य डॉ. के.एम. नलावडे, सरपंच विजय मोहिते, प्रा. डॉ. प्रताप लाड, नवनाथ गुंड.**

श्रमसंस्कार शिबिर हे योग्य माध्यम आहे. यातून श्रमाबरोबरच सामाजिक कार्यचे महत्व समजते.

यावेळी किरण लाड म्हणाले, महाविद्यालयाने श्रमसंस्कार शिबिर हे फक्त उपक्रम म्हणून न राबविता गावातील नागरिकांच्या व सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांच्या सहकार्याने एक काम म्हणून केले गेले हे महत्वाचे व प्रेरणादायी आहे. यामधून राजकारणविरहीत समाजकार्यासाठी मो.वडगाव यासाठी अग्रेसर आहे.

शिबिर काळामध्ये विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता, गटारी साफ करणे, लास्टीक मुक्त गाव, ग्राम सर्व्हे, याबरोबरच ज्येष्ठ नागरीक मेळाव्याचे आयोजन हळदी-कुंकू, शेतकरी प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. गणेश खारगे, ऊसविकास अधिकारी विलास जाधव, डॉ. एस. एच. पाटील, प्रा. विजय शिंदे, प्रा. डॉ. भरत महाडिक, आदींच्या व्याख्यानाचे आयोजन ही करण्यात आले होते.

प्रास्ताविक डॉ. पी.बी. लाड यांनी केले. श्रमसंस्कार शिबिराच्या संकल्पना प्रा. डॉ. के. एम. नलावडे यांनी विषद केली. सूत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ गुंड यांनी केले. आभार प्रा. एस.जी. चौरे यांनी मानले.यावेळी सुदाम मोहिते, दत्ताजी मोहिते, पांडूरंग मोहिते, भगवान मोहिते, हणमंत मोहिते, वसंतराव मोरे, विद्यार्थी, शिक्षक, उपस्थित होते.

दै. तरुणभारत, ता - 06/02/2018

क्षेण महाराष्ट्र
सरी | जिल्हा | ८ फेब्रुवारी २०१८

# वा योजनेतून समाज समजतो : मालन मोहिते




**मोहिते वडगाव येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत आयोजित श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मालन मोहिते. यावेळी उपस्थित किरण लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, सरपंच विजय मोहिते आदी.**

व गावातून बाहेर पडणे गरजेचे असते आणि याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबीर हे योग्य माध्यम आहे. यातून श्रमाबरोबरच सामाजिक कार्याचे महत्त्व समजते.

किरण लाड म्हणाले, महाविद्यालयाने श्रमसंस्कार शिबीर हे फक्त उपक्रम म्हणून न राबविता गावातील नागरिकांच्या व सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांच्या सहकार्याने एक काम म्हणून केले गेले, हे महत्त्वाचे व प्रेरणादायी आहे. यामधून राजकारणविरहीत समाजकार्यासाठी मोहिते वडगाव यासाठी अग्रेसर आहे.

शिबीरकाळामध्ये विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता, गटारी साफ करणे, १०० टक्के प्लास्टिक मुक्त गाव, ग्राम सर्व्हे; याबरोबरच ज्येष्ठ नागरिक मेळाव्याचे आयोजन हळदी-कुंकू, शेतकरी प्रबोधनपर कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. प्रा. गणेश खारगे, ऊसविकास अधिकारी विलास जाधव, डा. एस. एच. पाटील, प्रा. विजय शिंदे, प्रा. डा. भरत महाडिक आदींच्या व्याख्यानांचे आयोजनही करण्यात आले होते.

प्रास्ताविक डॉ. पी. बी. लाड यांनी केले. श्रमसंस्कार शिबिराच्या पाठीमागील संकल्पना प्रा. डॉ. के. एम. नलावडे यांनी विषद केली, सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ गुंड यांनी केले. आभार प्रा. एस. जी. चौरे यांनी मानले.

यावेळी सुदाम मोहिते, दत्ताजी मोहिते, पांडुरंग मोहिते, भगवान मोहिते, हणमंत मोहिते, वसंतराव मोरे, गावातील सर्व संस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.




**मोहिते वडगाव (ता. कडेगाव) : येथे श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना मालनताई मोहिते. शेजारी किरण लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, सरपंच विजय मोहिते, प्रा. डॉ. प्रताप लाड, नवनाथ गुंड आदी.**

# लाड कॉलेजच्या शिबिराचा समारोप

कुंडल, ता. १० : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चार भिंतीच्या बाहेरचा समाज समजून घेण्याचे शिक्षण राष्ट्रीय सेवा योजनेतून मिळते, असे मत माजी जि. प. अध्यक्षा मालनताई मोहिते यांनी व्यक्त केले. त्या मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होत्या. या वेळी क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, सरपंच विजय मोहिते, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे आदी उपस्थित होते. शिबिर काळामध्ये विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता, गटारी साफ करणे, प्लास्टिक मुक्त गाव, ग्राम सर्व्हे याबरोबरच ज्येष्ठ नागरिक मेळाव्याचे आयोजन केले. प्रा. गणेश खारगे, ऊसविकास अधिकारी विलास जाधव, डॉ. एस. एच. पाटील, प्रा. विजय शिंदे, प्रा. डॉ. भरत महाडिक आदींचे व्याख्यान झाले. कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ गुंड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. जी. चौरे यांनी आभार मानले.

दै. सकाळ, ता. ११/०२/२०१८